RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.**

:-०२२,२७५७१३९१. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.admin@mahalfa.in

**अतितात्काळ**

क्र स्था १८/ब/रिक्त पदांची माहिती/नस्ती क्र.४४३/आस्था-५/२५८६. दि. -2 DEC 2017

## परिपत्रक

विषय :- रिक्त पदांची माहिती MIS वर भरणेबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनस्त सर्व कार्यालयांची रिक्त पदांची स्थितीचे विवरणपत्र या संचालनालयाच्या Website वर M-०९-RH ऐवजी M-०९-DRH(New) या नावाने सुरू करण्यात येत आहे. यापूर्वीचे विवरणपत्र M-०९-RH हे केवळ प्रादेशिक विभागीय कार्यालयांमार्फत भरण्यात येत होते. यापुढे M-०९-RH या विवरणपत्राऐवजी M-०९-DRH(New) या विवरणरपत्रात सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयांनी रिक्त पदांच्या स्थितीचे MIS डिसेंबर २०१७ पासून प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भरावा व विभागीय कार्यालयांनी जिल्हा कार्यालयांचा सदर MIS महिन्याच्या ७ तारखेपर्यंत Approve करावयाचा आहे.

***उपसंचालक (म.न.पा.ले.प ), उपविभाग-३, औरंगाबाद यांचे कार्यालयातील ३ कनिष्ठ लेखापरीक्षकांच्या मंजूर पदांची आस्थापना सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर यांचेकडे असल्याने उपसंचालक (म.न.पा.ले.प ), उपविभाग-३, औरंगाबाद कार्यालयाने MIS भरताना सदर ३ पदे वगळून माहिती भरावयाची आहे.( उदा.भरलेल्या ४ कनिष्ठ लेखापरीक्षकांऐवजी १ कनिष्ठ लेखापरीक्षक) तसेच सदर ३ मंजूर पदांबाबतची माहिती सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर विभाग या कार्यालयाने भरावयाची आहे. सह संचालक, स्था.नि.ले. नागपूर या कार्यालयाने माहिती भरताना एकूण ११ मंजूर कनिष्ठ लेखापरीक्षकांची माहिती भरावयाची आहे.***

M-०९-DRH(New) मध्ये महिन्याच्या ७ तारखेपर्यत भरण्यात आलेली माहिती ग्राह्य धरली जाणार आहे. सदर माहिती ही वेळोवेळी शासनास सादर करावी लागत असल्याने माहिती अचूक व जबाबदारीने भरावी. अन्यथा माहिती चुकल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी जबाबदार राहील.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

प्रति,

१) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
२) उपसंचालक (म.न.पा.ले.प), उपविभाग-३, औरंगाबाद
३) सहाय्यक संचालक (प्रशासन/ संगणक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
४) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व जिल्हे

Harshada asb-४ /HCL/asb-४ letter/१८/०६/२०१७